# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २८-१२-२०१५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

सोमवार दिनांक २८ डिसेंबर २०१५ रोजी (का.प.क्र.१२) मा.महापौर श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील “प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह” येथे सकाळी ११-०५ वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.अति.आयुक्त श्री.रमेश पवार, नगरसचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स. श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
२. स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर
३. स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
४. स.स. श्री.खान जहाँगीर मुलानी
५. स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
६. स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू
७. स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण
८. स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
९. स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
१०. स.स. सौ.रोजतकर पुष्पा उत्तमराव
११. स.स. श्री.विजय साईनाथ औताडे
१२. स.स. श्री.सुरे सीताराम इसराम
१३. स.स. सौ.स्वाती किशोर नागरे
१४. स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१५. स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान
१६. स.स. श्री.जाधव ज्ञानोबा पांडूरंग
१७. स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय
१८. स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी
१९. स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
२०. स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
२१. स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद
२२. स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
२३. स.स. श्री.सय्यद मतीन रशीद
२४. स.स. श्रीमती शकीला बेगम फैयाजोद्दीन
२५. स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ
२६. स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल
२७. स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
२८. स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन

२९. स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
३०. स.स. सौ.शोभा नारायणराव वळसे
३१. स.स. सौ.ज्योती सुभाष पिंजरकर
३२. स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र
३३. स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी
३४. स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले
३५. स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग
३६. स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
३७. स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव
३८. स.स. श्री.शिंदे राजु रामराव
३९. स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम
४०. स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
४१. स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम
४२. स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ
४३. स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
४४. स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी
४५. स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी
४६. स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन
४७. स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया
४८. स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
४९. स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
५०. स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
५१. स.स. श्री.एडके विकास प्रकाश
५२. स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव
५३. स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम
५४. स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी
५५. स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास
५६. स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण
५७. स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
५८. स.स. श्री.शेख जफर अखतर
५९. स.स. श्री.जहागीरदार मोहम्मद अयुब गुलाम जिलानी
६०. स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
६१. स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब
६२. स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत
६३. स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान
६४. स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत
६५. स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी
६६. स.स. श्री.बारवाल गजानन रामकिसन
६७. स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण

६८. स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
६९. स.स. श्रीमती बनकर विजया संजय
७०. स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
७१. स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल
७२. स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
७३. स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
७४. स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
७५. स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव
७६. स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र
७७. स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
७८. स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव
७९. स.स. श्री. भगवान (बापु) देविदास घडमोडे
८०. स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल
८१. स.स. श्री.सोहेल शकील शेख
८२. स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
८३. स.स. श्रीमती साळवे अनिता मोहन
८४. स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब
८५. स.स. श्रीमती मिना रामदास गायके
८६. स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
८७. स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
८८. स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
८९. स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
९०. स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर
९१. स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
९२. स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ
९३. स.स. श्री.विकास रतनलाल जैन
९४. स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
९५. स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे
९६. स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
९७. स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन
९८. स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे
९९. स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे
१००. स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी
१०१. स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण

<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे</u>

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.कांबळे चेतन जनार्धन

५. श्री.चंदु किशनचंद तनवाणी

**संवाद:-**

श्री.जहागींर खान :नुर कॉलनी भागात डेंग्यु या आजाराने सय्यद जावेद, सह दोन मुलाचा मृत्यू झाला त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.राहूल सोनवणे :बहूजन समाज पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री.विलास गरूड यांच्या मातोश्री शांताआई गरूड यांचे दु:खद निधन झाले. त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.भगवान घडमोडे :स.सदस्या श्रीमती चावरीया यांचे सासरे राजू चावरिया यांचेही निधन झाले त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.नंदकुमार घोडेले :यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

या वेळी डेंग्यू या आजाराने सय्यद जावेद व इतर मृत्यू झालेल्या बालकास तसेच स्व.राजू चावरिया, स्व.शांताआई गरूड यांना सभागृहा तर्फे दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री.जहागींर खान :नुर कॉलनी भागात साफसफाई होत नव्हती. नाल्यामध्ये मोठी घाण साचलेली आहे. याकडे कुणी लक्ष देत नाही. त्यामूळे डेंग्यु आजाराने या दोन जवान मुलांचा मृत्यू झाला. या घटनेला जे जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही करावी. संबधीत मुलांच्या कुटूंबीयांना आर्थीक मदत करण्यात यावी.

श्री.गंगाधर ढगे :मा.आयुक्तांनी या नाल्याची पाहणी केली, तेव्हा तेथे गंभीर परीस्थिती होती. भुमीगत गटार योजनेचे अधिकारी श्री.खिल्लारे यांना पत्र दिले त्यांनी कार्यवाही केली नाही. तेथे साफसफाई नसल्यामूळे या दोन मुलांचा डेंग्यू या आजाराने मृत्यू झाला. भुमीगत गटार योजनेचे कामामध्ये अनेक नागरीकांचे नळ,ड्रेनेज लाईन तोडल्या जात आहे. संबधीत जे अधिकारी दोषी आहे त्यांचेवर पोलीस कार्यवाही करावी मृत्यू झालेल्या मुलांच्या कुटूंबीयांना नुकसान भरपाई द्यावी व भुमीगत गटार योजनेच्या कंपनीला यापुढे पैसे देऊ नये.

मा.अति.आयुक्त :या प्रकरणात सखोल माहिती घेऊन चौकशी करून संबंधीतावर कार्यवाही केली जाईल.

श्री.राजू शिंदे :केंद्रीय मंत्री महोदय मा.श्री.नितीनजी गडकरी साहेबांनी मराठवाड्याच्या विकासासाठी १५,७०० कोटी निधी मंजूर केला २५ तारखेला भुमीपुजन झाले यासाठी मा.श्री.अतुलजी सावे, विधानसभा अध्यक्ष मा.श्री.हरीभाऊजी बागडे, मा.श्री.रावसाहेबजी दानवे यांच्या प्रयत्नाने चिकलठाणा ते नगरनाका पर्यंतच्या रस्त्यासाठी ४४० कोटी मिळाले. मराठवाडयासह या शहरासाठी हा मोठा निधी मिळाला त्याबद्दल मा.श्री.गडकरी साहेब यांच्या अभिनंदनाचा ठराव घेण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :केंद्र शासनाचा हा निधी आहे यासाठी मा.खासदार श्री.चंद्रकातंजी खैरे यांनी ही प्रयत्न केले त्यांचेही अभिनंदन करावे.

श्री.नंदकुमार घोडेले :हा निधी केंद्र शासनाचा आहे. रस्त्यावर अनधिकृत होर्डींग्ज आहेत, कचरा पडलेला त्याचे आत्मपरिक्षण करण्याची गरज वाटते. मा.श्री.नितीनजी गडकरी साहेबांकडे सर्व मा.खासदार मा.आमदार यांनी पाठपुरावा केला त्यामुळे निधी आला सर्वांचे अभिनंदन करावे.

श्री.राजू शिंदे :या रस्त्याविषयी यापुर्वी चर्चा झाली. त्यावेळी हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे येतो असे सांगण्यात आले. तेंव्हा खासदार यांनी निधी आणण्यासाठी काय प्रयत्न केले? आता या रस्त्यासाठी मा.आमदार श्री.अतुलजी सावे यांनी प्रयत्न करून रक्कम रुपये ४४० कोटी निधी आणला. त्यांचेही अभिनंदनाचा ठराव मंजूर करावा.

श्री.भगवान घडमोडे :कोणी पाठपुरवा केला निधी आणला खोलवर जाऊ नये. मंत्री महोदय असतांना सुध्दा निधी वापरायला पाहिजे होता वापरला नाही. मा.श्री.नितीनजी गडकरी हे देशाचे नेते आहे. अभिनंदनाचा ठराव घेण्यात यावा.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतांत काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर :युतीच्या माध्यमातून आपण काम करीत आहोत. निधी येणारच आहे. अशी चर्चा करून वेगळे चित्र बाहेर जाऊ नये.

श्री.विकास जैन :समांतर, भुमीगत गटार, युआयडीएसएसएमटी योजने अंतर्गत मा.खैरे साहेबांनी निधी आणलेला आहे. हा निधी येण्यामध्ये त्यांचे प्रयत्न होते. त्यांचेही अभिनंदन करावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :शिवसेना-भाजपा युती आहे. मा.खासदार श्री. खैरे साहेब यांनीही या शहराच्या विकासासाठी प्रयत्न केले निधी आणला. ज्यांनी ज्यांनी हा निधी आणण्याचा प्रयत्न केला त्या सर्व मा.आमदार मा.खासदार व मा.मंत्री महोदयांचे अभिनंदन करावे.

श्री.नंदकुमार घोडेले :खासदार निधी कसा वापरायचा तो त्यांचा अधिकार आहे.राज्य शासन व केंद्र शासनाने हा निधी दिल्याबध्दल अभिनंदन करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :ज्यांनी ज्यानी हा निधी आणण्यासाठी प्रयत्न केले त्या सर्वांचे अभिनंदन करावे.

मा.महापौर :हा निधी मराठवाडा सह या जिल्हयासाठी तसेच मनपाच्या हद्दीत असलेल्या रस्त्यासाठी आहे. ही आनंदाची गोष्ट आहे. तसेच ४४० कोटी या शहरातील रस्त्यांसाठी आहे. यासाठी केंद्र शासनातील मा.ना.श्री.नितीनजी गडकरी साहेब यांनी निधी दिला यासाठी मराठवाडयाचे सर्व मा.खासदार जिल्हयाचे मा.पालकमंत्री व या शहराचे सर्व मा.आमदार यांनी प्रयत्न केले निधी आला या सर्वांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्यात येते.आता विषय पत्रिकेला सुरूवात करण्यात येते.

**<u>विषय क्रमांक २६९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.सर्वसाधारण सभा ठराव कमांक २३३/३ दिनांक २०.०१.२००४ व १९४/३ दिनांक १८.०२.२००६ नुसार सिडको अधिसुचित क्षेत्रातून वगळून महानगरपालिका हद्दीत समाविष्ट क्षेत्रासाठी व महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीसाठी शासनाने

मंजुर केलेली विकास योजना सुधारित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २३(१) सह कलम ३८ अन्वये इरादा जाहिर केलेला होता. या क्षेत्रासाठी प्रारूप विकास योजना तयार करणे संदर्भात औरंगाबाद महानगरपालिकेच्या विनंती नुसार शासनाने दिनांक १३.०१.२०११ च्या निर्णयानुसार उपसंचालक नगर रचना, विकास योजना विशेष घटक, महानगरपालिका औरंगाबाद या कार्यालयाची स्थापना केलेली असून हे कार्यालय दिनांक २०.०१.२०११ पासून कार्यरत आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेने वरील नमुद पारीत केलेले ठराव हे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ (१) सह कलम ३८ च्या मर्यादेतील असल्याने तसेच औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात सिडको अधिसुचित क्षेत्रातून वगळण्यात आलेले क्षेत्र नव्याने अंतर्भुत झाल्याने उक्त अधिनियमातील उक्त कलमाबरोबर कलम-३४ चा ही उल्लेख आवश्यक असल्याने या कार्यालयाच्या सुचनेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेने दिनांक १८.०५.२०११ चे ठराव क्र.३१७ अन्वये नव्याने याच विषयाबाबतचा ठराव पारीत केलेला आहे. त्या अनुषंगाने हा इरादा दिनांक ०७.०२.२०१३ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द झालेला आहे. तसेच उक्त अधिनियमाचे कलम-२४ अन्वये उपसंचालक नगर रचना, विकास योजना विशेष घटक, महानगरपालिका औरंगाबाद यांची औरंगाबाद महानगरपालिकेने आदेश क्रमांक २४३ दि.०५.०२.२०१३ अन्वये नगर रचना अधिकारी म्हणुन नेमणुक केलेली आहे.

तद्नंतर विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करून तो दिनांक ०१.०८.२०१४ रोजी उपसंचालक नगर रचना, विकास योजना विशेष घटक, महानगरपालिका औरंगाबाद यांनी औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केला आहे व तद्नंतर प्रारुप विकास योजना नकाशा व अहवाल तयार करून तो उपसंचालक नगर रचना, विकास योजना विशेष घटक, महानगरपालिका औरंगाबाद यांनी गोपनिय पत्र क्रमांक-११ दिनांक ३१.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये मा. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांच्याकडे सुपूर्द केला आहे. तरी उक्त प्रारुप सुधारित विकास योजना उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये प्रसिध्द करण्याची कार्यवाही मा.सर्वसाधारण सभेच्या ठरावा द्वारे करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या तरतुदीनुसार उक्त प्रारूप विकास योजना कलम २६(१) अन्वये प्रसिध्द करणेची मुदत, इरादा महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झालेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक ०७.०२.२०१३ पासून दोन वर्षापर्यंत म्हणजे दिनांक ०६.०२.२०१५ पर्यंत होती. उपसंचालक, नगर रचना हे पद रिक्त असून लातूर येथील उपसंचालक, नगर रचना प्रादेशिक योजना लातूर यांचेकडे अतिरीक्त कार्यभार आहे. तसेच या कार्यालयातील नगर रचनाकार यांचे पदही प्रदिर्घ काळापासून रिक्त आहे. परंतु उक्त विकास योजनेचे प्रारूप नकाशा आणि अहवाल तयार करण्याचे काम पुर्ण करण्यास लागलेला कालावधी विचारात घेता कलम २६(१) अन्वये प्रारुप सुधारित विकास योजना प्रसिध्द करणेसाठी ही मुदत एक वर्षासाठी म्हणजेच दिनांक ०७.०२.२०१५ ते दिनांक ०६.०२.२०१६ पर्यंत वाढवून घेणे आवश्यक आहे.

करीता वरील प्रमाणे प्रारुप सुधारित विकास योजना कलम २६(१) अन्वये प्रसिध्द करणे व मुदतवाढीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा आदेशास्तव सादर.

**संवाद:-**

| | |
|---|---|
| श्री.समीना शेख | :प्रारूप विकास योजना नकाशे विकास आराखडा याची गोपनीयता भंग झाली आहे. हा विकास आराखडा सभागृहात जाहीर होण्या अगोदर वृत्तपत्रात प्रसिध्द झालेला आहे तर यांचे स्टेटस काय?प्लॅन व्हॅलीड की इनव्हॅलीड आहे.ज्यांनी हा प्लॅन तयार केला त्यांना उत्तर देण्यासाठी बोलवावे. |
| श्रीमती सायरा बानो | :ऑगस्ट २०१४ मध्ये हा आराखडा सादर केला तर पुर्वी १९९१ ला २४ वर्षापुर्वी विकास आराखडा मंजूर केला त्या नुसार तेव्हा पासून किती विकास कामे झाली. मा.उच्च न्यायालयाने सुध्दा माहिती मागविली होती माझ्या माहिती प्रमाणे ८ टक्केच विकास केला असे असतांना नवीन प्लॅन देण्याची गरज होती का? सभागृहापुढे सादर होई पर्यत हा विकास आराखडा गोपनीय असतो. तो ओपन कसा झाला माहिती दयावी. |
| श्री.रावसाहेब आमले | :८-१० दिवसापुर्वीच पेपरला या प्लॅन विषयी माहिती प्रसिध्द झाली ती कुणी दिली चौकशी व्हावी. संबधीतावर गुन्हा दाखल करावा. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :सभागृहा समोर येण्यापुर्वी दै.लोकमतला प्रसार माध्यमापर्यत माहिती कशी गेली. गोपनीयता राखली गेली का? |
| श्री.नंदकुमार घोडेले | :ज्यांनी विकास आराखडा तयार केला ज्यांची त्यावर सही आहे त्यांचेकडून माहिती घ्यावी. |
| श्री.विकास जैन | :अनेक सदस्यांना या प्लॅन विषयी माहिती नाही सविस्तर माहिती घ्यावी. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :ज्यांनी तयार केला त्यांना खुलासा करण्यासाठी बोलवावे. मा.आयुक्तांना विश्वासात घेतले का? |
| मा.महापौर | :या प्लॅनची कार्यपध्दती व कसा सादर करायला पाहिजे माहिती दयावी. |
| श्री.विकास जैन | :प्रस्तावाची माहिती घ्यावी. हा डीपी युनीट कोणी स्थापन केले? कलम २६,२७, व कलम ३७ ची कार्यवाही काय असते सर्व सागांवे. |
| श्री.भगवान घडमोडे | :हा प्लॅन सादर करण्याची कार्यपध्दती कशी असते.प्रसिध्दी माध्यमापर्यत कसे गेले ज्यांनी प्रसिध्दीसाठी दिले त्यांचेवर कार्यवाही करावी. |
| श्री.नासेर सिद्दीकी | :नकाशात जे आहे त्याची माहिती प्लॅन सादर होण्या अगोदर बाहेर कशी गेली कोण दोषी आहे कार्यवाही करावी. |

यावेळी स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

| | |
|---|---|
| श्री.भगवान घडमोडे | :नकाशा व पेपरमधील बातमी यात साम्य असेल तर त्यांचेवर कार्यवाही करावी माझ्या माहिती प्रमाणे श्री.रजाखान यांचे मोबाईल मध्ये नकाशाची कॉपी आहे त्यांचे फेवरच्या लोकांना माहिती दिली. |
| मा.उपमहापौर | :प्रारूप विकास आराखडा संदर्भात पेपरला बातमी आली.हा आराखडा सादर करतांना ज्यांनी कुणी हा नकाशा बनविला त्यांनी गोपनियता पाळली का? अहवाल मा.आयुक्ताकडे सादर केलेला असतांना पेपरला प्रसिध्द का झाला? आरक्षणा संदर्भात पेपरला बातमी आहे. ते व |

आराखडयातील आरक्षण यात साम्य असेल तर सभागृहाची एक प्रकारे फसवणुक होत आहे. ही गंभीर बाब आहे खुलासा घ्यावा.

श्री.रावसाहेब आमले :पेपरला आलेली बातमी व नकाशातील आरक्षण यात साम्य असेल तर ज्यांनी अहवाल फोडला, त्यांचेवर गुन्हे दाखल करावे.

श्री.विकास जैन :ह्या डी.पी.प्लॅन मधील काही गोष्टी लॅप्स करणे, त्यात बदल करणे अधिकार सभागृहास आहे. अगोदर विकास आराखडा आपण स्विकारावा त्यानंतर पेपरला आलेल्या बातमीनुसार बरोबर असेल तर संबंधीतांवर कार्यवाही करावी.

कु.यशश्री बाखरीया :पेपरची बातमी ही प्लॅननुसार असेल तर ज्यांनी ही गोपनीयता भंग केली त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.नंदकुमार घोडेले :प्लॅन नुसार पेपरची बातमी खरी असेल तर गोपनियतेचा भंग झालेला आहे संबंधीतांवर कार्यवाही करावी. शासनाने निश्चित केलेल्या अधिकाऱ्यांनी अहवाल तयार केला या विभागातून गोपनीय अहवालाची बातमी बाहेर जात असेल तर गंभीर बाब आहे. संबधीतावर गुन्हे नोंदवावेत.

श्री.भाऊसाहेब जगताप :आराखड्यानुसार पेपरला आलेली बातमी बरोबर असेल तर संबंधीतांवर कार्यवाही करावी. याचा अर्थ यात मोठा आर्थीक घोटाळा झालेला आहे.

श्री.राजू शिंदे :पेपरला बातमी आली नकाशा पब्लीश झाला. गोपनीय विकास आराखडा प्रत आलेली आहे. आलेली बातमी व या आराखड्यात जर साम्य असेल तर त्या अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही करता येते का? तसेच हा नकाशा रद्द करता येतो का? विधी सल्लागार यांचा खुलासा घ्यावा.

श्रीमती सायरा बानो :नियमानुसार ह्या प्लॅनला मुदतवाढीस सभागृहाची मंजूरी घेतली होती का?

श्री.भगवान घडमोडे :शहर यलो-झोन मध्ये अशी बातमी आली हे सत्य समजायचे का? अशी बातमी जेव्हा येते ज्यांनी प्लॅन केला श्री.रजाखान हे सेवेत होते का? त्यांचेवर किती खर्च पगार कोणी दिला. तो खर्च किती. २० वर्षासाठी हा प्लॅन आहे मोघम उत्तर घेऊन योग्य नाही. यावर अभ्यास करावा लागेल हा विषय आराखडा समजावून सांगावा.

श्रीमती समीना शेख :हा प्लॅन ओपन करण्यापुर्वी एमआरटीपी कलम २६(२)नुसार पोटकलमाच्या तरतुदीची पुर्तता करण्यात आली का? तसेच कलम २६(१)अन्वये विकास योजना सादर करण्यात आली शासकीय राज्यपत्रामध्ये याची नोंद आहे का ?

श्रीमती किर्ती शिंदे :सर्व सदस्यांना नकाशाची प्रत देऊन अभ्यासासाठी १० दिवस देऊन निर्णय घ्यावा त्यानंतर जनतेसाठी प्रसिध्द करावे.

सहा.संचालक(न.र) :आजचा विषय विकास योजना आराखडा औरंगाबाद महापालिकेसाठी आहे.यासाठी उपसंचालक नगररचना विशेष घटक महानगरपालिकेमध्ये

शासनाच्या मंजुरीने स्थापन करण्यात आले आहे.उपसंचालक नगररचना अधिकारी हे सुट्टीवर असल्याने मी त्यांचे वतीने खुलासा करीत आहे.

श्री.राजू शिंदे :महत्वाचा विषय आहे संबधीत अधिकारी सभेला माहिती देणेसाठी उपस्थित असणे गरजेचे आहे. हा सभागृहाचा अवमान आहे.

श्री.जहागींर खान :संबधीत अधिकारी उपस्थित नाही सभा तहकूब करावी.

सहा.संचालक (न.र) :दिनांक ५-२-२०१३ च्या अधिनस्त व २४३ च्या अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये उपसचांलक नगररचना विकास योजना अधिकारी विशेष घटक म्हणून नियुक्ती केली आहे त्यानंतर औरंगाबाद महापालिकेने खुल्या क्षेत्राचा भाग मुल्यमापन तयार करण्याच्या अनुषंगाने काम दिलेले आहे. त्यानुसार विदयमान मुल्यमापन नकाशाचे तपासनीचे काम करून नवीन वापर नकाशा एमआरटीपी १९६६ च्या २५ चे तरतुदी नुसार १-८-२०१५ रोजी महापालिकेला सादर केला. १९९१ ला महापालिकेने मंजूर वाढीव हक्क त्यामधील मुळ मंजूर विकास योजनातील औरंगाबाद क्षेत्रातील मंजूर विकास योजना सुधारीत करणे सिडको हडकोतील क्षेत्रातील वगळण्यात आलेल्या क्षेत्राची आणि ठराविक समावेश झालेल्या भागाचाही विकास योजना तयार करण्याचे काम करण्यात आले यासाठी ७-२-२०१३ ते ६-२-२०१५ पर्यत कायद्याची मुदत आहे. त्यानंतर ६-६ महिन्याची दोनदा मुदत देता येते. त्यानुसार दिनांक ६-२-२०१६ पर्यंत मुदत आहे हा मंजूरीसाठी सादर केले मंजूरी मिळाल्यानंतर कलम २६(१) प्रमाणे गॅझेटमध्ये प्रकाशीत होईल. त्यानंतर नागरीकांच्या पाहणीसाठी सुचना हरकती घेणेसाठी २ महिने उपलब्ध राहिल. त्या काळात ज्यांच्या सुचना हरकती देतील नंतर कलम २८(२) नुसार एक कमेटी स्थापन होईल त्यात स्थायी समितीचे ३ सदस्य व शासनाचे ४ असे एकुण ७ सदस्य असतील.

श्री.राजू शिंदे :संबधीत अधिकारी येथे उपस्थित असावे. २०१३ पासून ६-२-२०१५ पर्यंत दोन वर्षाचा कालावधी होता त्यानंतर मुदतवाढ घेणे आवश्यक होते घेतली नाही आता ७-२-१६ पर्यत मुदत घेत आहे. एक वर्षाची मुदत कुणी दिली? आयुक्तांना अधिकार होते का?

श्री.राजेंद्र जंजाळ :मुदतवाढीसाठी तसा प्रस्तावच आलेला नाही. आता प्रस्ताव दिला.विलंब कशामुळे केला माहिती मिळाली नाही.

श्री.राजू शिंदे :दिनांक ६-२-२०१५ नंतर मुदतवाढ घेतली नाही. आज मंजूरीसाठी आणलेला आहे सहा महिण्याची मुदत दयावी

श्री.रेणुकादास वैद्य :एक्झीस्टींग विकास आराखडा सादर करायला पाहिजे. नवीन विकास आराखडा उशीरा सादर केला. मुदत संपून १० महिने झाले. याची जबाबदारी कुणाची येते. एमआरटीपी ॲक्ट प्रमाणे जनतेसाठी प्रसिध्द व्हायला पाहिजे. नियमात तरतुद असतांना ते नियम पाळले नाही. प्लॅन तयार करण्यावर रक्कम रुपये १ कोटी खर्च केले. वेळेवर जनतेसाठी प्रसिध्द केला नाही. या एक वर्षाच्या काळात अनेक ठिकाणी प्लॉटींग

झाली. परीस्थिती बदलली. झालर क्षेत्रातही अशी परीस्थिती आहे. तेथेही असाच प्लॅन केला १० हजार अक्षेप आले अधिका-यावर आरोप झाले. झालर क्षेत्राचा अजूनही निर्णय नाही. नवीन विकास आराखडा करण्यासाठी युनीट स्थापन केले त्या युनीटमधील अधिकारी यांनी जागेवर जाऊन स्थळ पाहणी केली नाही. अगोदरचा नकाशा पाहिला नाही सहा.संचालक नगररचना व मा.आयुक्त यांना सुध्दा या नकाशाची माहिती पुर्ण नसावी.खालच्या लोकांच्या सांगण्यावरून हा प्लॅन केला.हा प्लॅन खुला करणार आहोत कलम ३० मध्ये स्पष्ट म्हटले की महापालिकेकडे आल्यानंतर एक वर्षाचा कार्यकाळ आहे.२०३६ पर्यंत प्लॅन करीत आहोत घाई नको. एक्झीस्टींग प्लॅन मध्ये जे चेजेंस झाले त्यावर अभ्यास होऊ दयावा आमच्या सुचना देऊ. एक्झीस्टींग प्लॅन सुध्दा ओपन करण्याची गरज आहे ते केले नाही. यात झालेले बदल यावर अभ्यास केल्यानंतर बैठक आयोजित करावी प्रसिध्द केल्यानंतर ०२ महिण्याची मुदत आहे.हे तयार करण्यास सक्षम अधिकारी मागवावे चांगले प्लॅनींग व्हावी मुदतवाढ घ्यावी.

श्री.राजू शिंदे :१-८-२०१४ रोजी मा.आयुक्ताकडे प्लॅन दाखल केला तेंव्हापासून एक वर्ष की आजपासून एक वर्ष ग्रहीत धरणार आहे. ज्यांनी विकास आराखडा तयार केला ते अधिकारी आल्यानंतर सभा आयोजित करावी

श्री भगवान घडमोडे :यास अगोदरच उशीर झाला पुन्हा उशीर झाल्यास शहरात अनधिकृत प्लॉटींगची संख्या वाढेल. सुविधा देणे अवघड होईल प्लॅन स्विकारावा त्यावर चर्चा करावी ज्या त्रुटी असतील दुरूस्त कराव्या यात काय बदल करू शकतो ७-१२ बघावे, यलो केले असेल तर रद्द करू शकता. मंजूर केले नाही तर शासन मंजूर करू शकेल.जनतेसाठी खुलासा करावा. सजेशन ऑब्जेक्शन घ्यावे दुरूस्त्या कराव्या जेथे लोक राहतात तेथील आरक्षण काढावे लागतील नंतर चर्चा करायची ती करावी हा प्लॅन आज स्विकारावा.

मा.महापौर :जनतेसाठी केंव्हा खुलासा करावा लागणार? शासनाकडे केंव्हा पाठवायचा? माहिती द्यावी.

सहा.संचालक (न.र) :आज स्विकारल्यानंतर २८(१) नुसार ६ फेब्रुवारी २०१६ पुर्वी प्रसिध्द केला पाहिजे अंतीम मुदत आहे. दिनांक ७-२-२०१३ पासून दोन वर्षाची तयार करण्यासाठी मुदत होती ती दिनांक ६-२-१५ पर्यंत होती पुढे ६-६ महिण्याची दोनदा मुदतवाढ देता येते ती दिनांक ६-२-२०१६ रोजी संपते.

श्री.रेणुकादास वैद्य :एमआरटीपी कलम ३० वाचावे. सादर झाल्यानंतर एका वर्षाच्या आत सादर करायचे आहे.

सहा.संचालक (न.र) :ही मंजूर केल्यानंतरची बाब आहे.

श्री.राजू शिंदे :दिनांक ६-२-१५ नतंर मुदतवाढ घेतली नाही १० महिने उशीरा आराखडा सादर केला. आता वेळ कमी राहिला आहे. आता मंजूर केले

नाही तर शासन त्यांचे अधिकारात मंजूर करील. आपले अधिकार काढल्या सारखे होईल.

सहा.संचालक (न.र) :सर्वसाधारण सभा नियोजन प्राधीकरण आहे. फेरबदल करण्याचे या सभागृहाला अधिकार आहे. दिनांक ६-२-१६ पुर्वी गॅझेट मध्ये पाठविणे आवश्यक आहे. त्यानंतर दोन महिने नागरीकांसाठी सुचना/ हरकतीसाठी ठेवला जाईल. आलेल्या सुचना/हरकतींवर सुनावणी होऊन कार्यवाही करावी लागेल.

श्री.राजू शिंदे :१ महिन्याच्या कालावधीत मंजूर करणे, गॅझेट मध्ये येणे सुचना हरकती घेणे शक्य होईल का ?

श्री.नंदकुमार घोडेले :प्लॅन येण्यास उशीर झालेला आहे जेंव्हा सादर केला तेंव्हाची स्वाक्षरी त्या अधिका-याची असेल.त्यास महापालिका दोषी नाही जे दोषी असेल त्याचेवर कार्यवाही करावी एक्झीस्टींग प्लॅन वर कुणाची सही आहे.अस्तित्वात असलेला विकास आराखडा निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. या विकास आराखडया बाबतीत मा.जिल्हाधीकारी यांचे कडे एलो प्लॅन बाबत चर्चा विनिमय करायला पाहिजे. सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस विभाग असेल व शासनाने ज्या ज्या साठी आरक्षण ठेवले त्या विषयी विचारात घेणे आवश्यक आहे. डीपी प्लॅनवर अतिक्रमण झालेले आहे. १२७ च्या नोटीस नुसार कोणत्या जागा कशासाठी दिल्या आहे हे पाहणे गरजेचे आहे. गायराण जमिनीवर आरक्षण टाकले गेले हा प्लॅन स्विकारावा सत्यता पडताळणी करावी.

श्रीमती माधुरी देशमुख :हा विकास आराखडा अहवाल स्विकारावा दुमत नाही. चूक झाली त्यावर पांघरूण घालता येणार नाही. २ वर्ष प्लॅन तयार करण्यासाठी मुदत होती ती २०१५ मधे संपली त्यानंतर वेळोवेळी मुदतवाढ का घेतली नाही? व ती न घेता आलेला प्लॅन किती कायदेशीर आहे? अभ्यास करावा लागेल. सक्षम अधिकारी नाही. लातूर येथील अधिकारी अहवाल तयार करतात हे योग्य आहे का? एका वर्षाची मुदत ही केंव्हा पासून ग्राह्य धरता येईल?

श्री.अय्युब म.जहागीरदार : प्रशासनाकडे सादर केलेला विकास आराखडा स्विकारायचा आहे. त्यात असलेल्या दुरूस्त्या करून घेणेसाठी पुन्हा बैठक आयोजित करावी. ज्यांनी तयार केले ते अधिकारी हजर राहतील त्या दिवशी बैठक आयोजित करावी.

श्री.सिताराम सुरे :विकास आराखडा आलेला आहे स्विकारावा. त्यात असलेल्या दुरूस्त्या करता येतील. पेपरला आले ते खरे की खोटे कळेल. हर्सुल सर्वे नं.१५६ मार्केट कमेटीचे २५ वर्षापासून आरक्षण तसेच जाधववाडी येथे सर्वे नं.१२,१३,१५ हा मार्केट कमेटीने आरक्षण करून ठेवला ते भुसंपादन केला नाही. त्यामूळे जळगाव रोडवर येण्यासाठी १०-१२ हजार लोकांना मुख्य रस्ताच नाही. हे आरक्षण उठवून त्या जागेवर नवीन डीपी रस्ते १२ मी. ६० मी रस्ते करावेत. सन-१९९१ च्या डीपी प्लॅन नुसार पाण्याची टाकी, दवाखाने यासाठी आरक्षित असतील. त्या जागा

भुसंपादन केल्या नाही. ज्या रस्त्यांसाठीच्या जागा होत्या त्या भुसंपादन केल्या नाही. ते आगोदर करावे. माझ्या वार्डातील ३६ मी. चा रस्ता जो तीन वार्डातून जातो तो भुसंपादीत करण्याची मागणी करतो. कार्यवाही केली नाही. कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये १५ मीटर रस्ता मंजूर केलेला आहे तो रस्ता २० मी. करता येईल जे की सर्वे नं १५५ मधील नागरीकांना ये-जा करण्यासाठी रस्ता आवश्यक आहे. ज्यासाठी जागा आरक्षीत होत्या भुसंपादन केले असते तर गुंठेवारीच्या लोकांना रस्त्याच्या बाबतीत अडचणी निर्माण झाल्या नसत्या. माझ्याकडे गुंठेवारी गाव नकाशा आहे. तो आपणाकडे देण्यात येतो. योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे.

श्रीमती समीना शेख :सन-१९९१ च्या विकास आराखडयानुसार किती टक्के अंमलबजावणी झाली. तसेच ८-१० वर्षापुर्वी मा.उच्च न्यायालयात विकास योजना अंमलबजावणी संबंधी ॲक्शन प्लॅन दाखल केला होता. त्यानुसार अंमलबजावणी झाली का? यात मा.न्यायालयाचा अवमान होतो का? खुलासा करावा.

श्री.अब्दुल ताहेर शेख :हा प्लॅन गोपनीय होता का? असेल तर प्रसिध्द कसा झाला? त्याची चौकशी करून दोषींना शिक्षा होणे आवश्यक आहे.

मा.उपमहापौर :हा अहवाल गोपनीय ठेवणे गरजेचे होते की नाही?

सहा.संचालक (न.र) :सर्वसाधारण सभा ही नियोजन प्राधिकरण आहे. यात योग्य व आवश्यक त्या दुरूस्त्या करून मंजूर केला तर पुढील कार्यवाही करता येईल. हे गोपनीय असणे अभिप्रेत आहे. महापालिकेकडे दाखल केल्यानंतर हे गोपनीय होते.

श्री.राजू शिंदे :हा विकास आराखडा पब्लीश करावा. सभा तहकूब करावी. संबंधीत अधिकारी येईल त्यावेळी चर्चा करावी.

श्री.अब्दुल र.नाईकवाडी:संबधीत अधिकारी यांचेवर काय कायदेशीर कार्यवाही करू शकतो?

श्री.राजेंद्र जंजाळ :विद्यमान वापर नकाशाचा अहवाल डिक्लेअर करावा. त्यानंतरच हा अहवाल जाहीर करावा.

श्री.भगवान घडमोडे :महत्वाचा विषय असतांना संबंधीत अधिकारी उपस्थित नाही.

मा.महापौर :यावर चर्चा करण्यासाठी वेळ मिळावा ही सदस्यांची मागणी आहे. यावर योग्य निर्णय घेण्यासाठी सर्वसाधारण सभेला अधिकार आहे. नागरीकांसाठी प्रारुप विकास आराखडा प्रसिध्द झाल्यानंतर ज्या त्रुटया असतील त्या दुर करता येतील. विकास आराखडा स्विकारण्यापुर्वी पेपरला, व्हॉटस्ॲप वर नकाशासह बातम्या आलेल्या आहेत. ते व नकाशातील स्थिती सारखी असेल तर संबंधीत अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यासाठी शासनाकडे मागणी करता येईल. यामध्ये दुरूस्तीचे अधिकार महापालिकेला आहेत. हे स्विकारण्यास हरकत नाही. पुढील सभेत नगररचनाचे संबंधीत अधिकारी असतील. या प्रकरणात जे अधिकारी दोषी असतील त्यांचेवर कार्यवाहीसाठी शासनाकडे शिफारस केली जाईल हा अहवाल स्विकारण्यात येतो.

यावेळी मा.महापौर हे विकास आराखडा स्विकारतात.

| | |
|---|---|
| श्री.राजू शिंदे | :ही सभा आता तहकूब करावी. |
| श्रीमती सायरा बानो | :यात गरीब वस्ती, सर्वसामान्यांचे, विधवांचे घर पाडले जाणार नाही, कुणी उघडयावर येणार नाही, याची दखल घ्यावी. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :एक्झीस्टींग प्लॅन घेण्यात यावा. तर यावर अभ्यास करता येईल. |
| सहा.संचालक (न.र) | :नकाशा दिला जाईल. |
| मा.उपमहापौर | :एक्झीस्टींग प्लॅनवर मा.आयुक्तांची सही असणे गरजेचे आहे. ती सही घेतलेली आहे का? |
| सहा.संचालक (न.र) | :मा.आयुक्तांची सही नाही. मा.महापौरांकडे दुपारी हा प्लॅन सादर केला जाईल. |
| मा.उपमहापौर | :यापुर्वीच्या प्लॅनवर कशासाठी कुठे आरक्षण आहे? हे माहीत नसेल तर हा प्लॅन कसा ॲक्सेप्ट करू शकतो. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :अगोदरचा प्लॅन काय होता? समोर यायला पाहिजे त्यानुसारच आता यात काय बदल करायचे ते समजेल. त्यावर आयुक्तांची सही नाही आता कोणते आयुक्त सही करणार आहे? |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :एक्झीस्टींग प्लॅन सादर करणे आवश्यक आहे की नाही? |
| सहा.संचालक (न.र) | :गरजेचे आहे. |
| श्री.नासेर सिद्दीकी | :अधिकारी जबाबदारीने काम करीत नाही. एक्झीस्टींग प्लॅनवर आयुक्तांची सही नाही. काहीही उत्तरे देतात हे बरोबर नाही. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :एक्झीस्टींग प्लॅन जो पर्यंत सादर होत नाही. तोपर्यत पुढील कार्यवाही करता येत नाही. जे की त्या जागेवर सद्यस्थितीत घरे इतर इमारती आहेत पहावे लागेल. तोपर्यत ही प्रक्रिया थांबवावी. |
| मा.उपमहापौर | :एक्झीस्टींग प्लॅनवर सही कोण करणार आह? |
| सहा.संचालक (न.र) | :जे सादर करतील त्यांची स्वाक्षरी असेल. |
| श्री.राजू शिंदे | :आता मंजुर करण्याला अर्थ नाही. संबंधीत नगर रचनाचे अधिकारी येथे नाहीत. एम.आर.टी.पी.ॲक्ट-१९६६ चे कलम १६ अन्वये प्रादशिक योजना तयार करतांना व मान्य करतांना अनुसरावयाची कार्यपध्दती पुर्णपणे अंमलात आणली नाही. मुद्दा क्रमांक-०१ नुसार प्रदेशाचा विद्यमान जमीन वापर नकाशा किंवा आवश्यक वाटतील असे इतर नकाशे तयार करून शासनाकडे पाठवावे लागतात. परंतु त्या कलमाद्वारे निर्धारीत केल्याचे दिसून येत नाही. आराखड्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडून आक्षेप आणि सुचना मागविण्यात येतील असे नमूद असतांना निर्धारित वेळेत हे झालेले नाही. विद्यमान नकाशा सादर करावा लागतो तो वेळीच देण्याबाबत कार्यवाही केल्याची दिसून येत नाही. हे महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलमाचे उल्लंघन करणारे आहे. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :कलम १६ चे पुर्णपणे उल्लघंन झालेले आहे. |
| सहा.संचालक (न.र) | :एम.आर.टी.पी.ॲक्टचे कलम-१६ हे या प्लॅनशी संबधीत आहे. एम.आर.टी.पी.ॲक्टचे कलम २६ चे अवलोकन करत असतांना |

एक्झीस्टींग प्लॅन डिक्लेअर करणे आवश्यक आहे की नाही? माहिती घ्यावी लागेल.

श्री.राजू शिंदे :यात कलम ४९,२६,३७ चे उल्लघंन झाले. मी जबाबदारीने बोलत आहे. निष्काळजीपणा केलेला आहे. जर बैठक आयोजित केली नसती, तर लोकांच्या मर्जीप्रमाणे मंजूर केले असते. पैसे जमा करून अनेक भाग यलो मध्ये घेतलेले आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :निष्काळजीपणा नाही, जाणून बूजून यात बदल केले. एक्झीस्टींग प्लॅन आताच सभागृहात घ्यावा. त्यानंतर या बाबत कार्यवाही करावी.

श्री.जहागीर खान :अधिकारी उत्तर देण्यास सक्षम नाही. त्यांना माहिती नाही, चुकीचे सादर केले.

सहा.संचालक (श्री.अनासपुरे):उप-संचालक, नगररचना हे सुट्टीवर असल्याने ज्या काही शंका उपस्थित केल्या त्या बाबत उप-संचालक, नगर रचना अधिकारीच खुलासा करू शकतील.

श्री.राजू शिंदे :सभा तहकूब करावी. ज्या वेळेस संबंधीत अधिकारी येतील त्यावेळी सभेचे आयोजन करावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :विद्यमान जमीन वापर नकाशा का सादर केला नाही?

श्री.विकास जैन :अधिकारी नाही सभा तहकूब करावी.

श्री.राजू शिंदे :महत्वाची सभा असतांना संबंधीत अधिकारी उपस्थित नाही. शहराच्या जिव्हाळयाचा हा प्रश्न आहे. संबंधीत अधिकारी यांचे विषयी नगर विकास विभाग किंवा मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचेकडे तक्रार दाखल करावी.

मा.महापौर :सभागृहाच्या भावना लक्षात घेता विद्यमान जमिन वापर नकाशा काय आहे? नवीन नकाशानुसार काय आहे? यावर अभ्यास करण्यासाठी वेळ लागेल. हा प्लॅन अंतिम करीत असतांना पुर्वीचे आरक्षण काय आहे? आता कशासाठी आहे? जेथे मंदीर, मस्जीद इतर धार्मीक स्थळ असेल तेथे आरक्षण टाकले याचाही विचार करावा लागेल. आजची सभा तहकूब करून जेंव्हा सभा आयोजित होईल त्यावेळी संबधीत अधिकारी सभागृहाला माहिती देणेसाठी त्यांनी सभेला उपस्थित रहावे. एक्झीस्टींग प्लॅन मुद्दामहून थांबविला काय? का देण्यात आला नाही? याची माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही केली जाईल. संबधीत अधिकारी यांनी सभागृहाला माहिती देणेसाठी पुढील सभेत उपस्थित राहवे.

श्री.नंदकुमार घोडेले :पॉवर प्रेझेन्टेशन करावे. सदस्यांना माहिती दयावी.

श्रीमती समीना शेख :सर्व सदस्यांना नकाशाची एक प्रत देण्यात यावी.

मा.महापौर :सर्व सदस्यांना नकाशाची प्रत देण्यात यावी. पुढील सभेत नगररचना विभागाच्या संबंधीत अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्यास्तव कळविण्यात यावे. आजची सभा तहकूब करण्यात येते.

या बरोबरच सभा तहकूब केल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद.